N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

Plom -14/06/2024 At 3:11 p.m.

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** मंगळवेढा ASJ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0456 **Year (वर्ष):** 2024 I/C

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**13/06/2024 23:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 13/06/2024

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/06/2024

**Time From (वेळेपासून):** 17:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/06/2024 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/06/2024 23:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मंगळवेढा ते श्री दामाजी कारखान, मंगळवेढा, ता मंगळवेढा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नागेश बसवेश्वर शिलवंत

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1997

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा महमदाबाद शेटफळ,मंगळवेढा,मंगळवेढा,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा महमदाबाद शेटफळ,मंगळवेढा,मंगळवेढा,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रकांत गणपतराव इंगोले | | | 1. यशोदा पतसंस्थेच्या मागे,रा दत्तु गल्ली,,मंगळवेढा,मंगळवेढा, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000 रुपये | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि:- 13/06/2024
मी नागेश बसवेश्वर शिलवंत, वय 27 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - शिपाई, नेम - सैन्य दल, मुळ रा. महमदाबाद (शेटफळ), ता. मंगळवेढा, जि. सोलापूर मो.क्रं.7391941424, समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की, मी दि.13/06/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक श्री महाडिक यांचेशी फोन द्वारे संपर्क साधुन लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 13/06/2024 रोजी 17.00 वा. मंगळवेढा एमआयडीसी येथे येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने आले. तेथे पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की, माझे वडील नामे बसवेश्वर महादेव शिलवंत यांचे नावे महमदाबाद (शेटफळ) येथे गट नं. 205/3/अ मध्ये 57 आर इतकी शेतजमीन असुन त्यांनी सदरची शेत जमीन माझा मोठा भाऊ श्री नंदकिशोर बसवेश्वर शिलवंत यांचे नावे दि. 15/05/2024 रोजी रजीस्टर बक्षीसपत्र केली आहे. त्यानंतर माझा भाऊ नंदकिशोर याने सदर शेतजमीनीच्या 7/12 उताऱ्यावर वडीलांचे नाव कमी होवुन त्याचे नाव नोंद होणेकरीता तलाठी सज्जा महमदाबाद (शेटफळ) यांचेकडे सर्व कागदपत्रे जमा केली. माझा भाऊ नंदकिशोर हा देखील सैन्य दलात शिपाई यापदावर असुन त्याची नेमणुक ही जम्मु - काश्मीर येथे असल्याने तसेच त्याची सुट्टी संपल्याने तो त्याचे नेमणुकीचे ठिकाणी निघुन गेला. त्यामुळे त्याच्यावतीने मी सदर प्रकरणाचा पाठपुरावा करण्याकरीता संबधीत तलाठी याना भेटुन विचारपुस केली असता तलाठी पंडीत यांनी ऑनलाईन नोंद धरुन मंजुरीकरीता मंडळ अधिकारी, मंडळ मारापुर यांचेकडे वर्ग केले असल्याबाबत सांगीतले. त्यावरुन मी मंडळ अधिकारी मारपुर श्री इंगोले यांचेकडे पाठपुरावा केला असता त्यांनी सदरची नोंद मंजुर करण्याकरीता 12 ते 15 हजार रुपये खर्च येतो असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली असुन मंडळ अधिकारी इंगोले यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली. व सदरची तक्रार स्व:हस्तक्षरात लिहुन दिली.
त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन मंडळ अधिकारी इंगोले यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुशंगाने पोनि महाडिक यांनी मला मंडळ अधिकारी इंगोले यांची भेट कोठे होईल असे विचारले असता काहीवेळापुर्वी मला इंगोले यांचा फोन आला असुन त्यांनी मला मंगळवेढा शहरातील श्री दामाजी पुतळा (चौक) येथे बोलाविले असल्याबाबत पोनि महाडिक व दोन्ही पंचांना सांगीतले. त्यावरुन मंडळ अधिकारी इंगोले यांचेवर श्री दामाजी पुतळा (चौक) येथे पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.
त्याअनुशंगाने पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर मंडळ अधिकारी इंगोले यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुशंगाने मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन श्री दामाजी पुतळा (चौक) येथे पाठविले. सदर ठिकाणी मी व पंच 01 असे गेलो असता तेथे मंडळ अधिकारी इंगोले दिसुन आले नाहीत. त्यामुळे मी माझा मो.क्रं. 7391941424 वरुन इंगोले यांचा मो.क्रं. 9970818920 वर फोन करुन मी श्री दामाजी पुतळा (चौक) येथे आलो असल्याबाबत सांगीतले. त्यावर इंगोले यांनी मला बोराळ नाका, महीला हॉस्पिटल येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच 01 असे सदर ठिकाणी गेलो असता इंगोले हे महीला हॉस्पिटलच्या शेजारी रस्त्यावरच थांबलेले होते.
सदर ठिकाणी मी इंगोले यांच्याशी प्रलंबित कामाबाबत चर्चा केली असता इंगोले यांनी नोंद घेतली असुन उद्या उतारा घ्या असे सांगीतले. व हाताने पैश्याचा इशारा करत काय आणलं नसल तर उद्या परवा द्या असे म्हणाले त्यावर मी इंगोले यांना तुम्ही त्यादिवशी 12 ते 15 हजार म्हणाले होते असे म्हणालो असता इंगोले यांनी तु 8,000/- रुपये दे

असे म्हणुन 8,000/- रुपये लाचेची मागणी केली त्यावर मी त्यामध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता इंगोले यांनी 7,000/- रुपयांची मागणी केली त्यावर मी त्यांना आता 5,000/- रुपये देतो. उर्वरीत 2,000/- रुपये उद्या देतो असे सांगीतले. त्यावर इंगोले यांनी होकार देवुन घेवुन येण्यास सांगीतले. त्यावर मी पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

त्यानंतर मंडळ अधिकारी इंगोले यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुशंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सर्व सापळापुर्व कार्यवाही पुर्ण केली. व मी हजर केलेली लाच रक्कम 5,000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टच्या डावे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुशंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. सदरची सापळापुर्व कार्यवाही चालु असतेवेळी मला इंगोले यांचा फोन आला त्यावेळी मी सदरचा फोन कॉल रिसिव्ह करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये इंगोले यांनी मला लवकर श्री दामाजी पुतळा (चौक) येथे येण्यास सांगीतले.

त्यानंतर मंडळ अधिकारी इंगोले यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता पोनि महाडिक यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन श्री दामाजी पुतळा (चौक) येथे रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे श्री दामाजी पुतळा (चौक) येथे पोहचलो असता मला इंगोले यांचा फोन आला सदरचा फोन कॉल मी रिसिव्ह करुन स्पिकर ऑन न करता संभाषण केले. त्यामध्ये इंगोले हे मला लाच रक्कम ही दुस-याकडे देण्यास सांगत होते. त्यावर मी त्यांना सदरची रक्कम तुमच्याकडेच देतो असे सांगीतले असता इंगोले यांनी मला कारखाना रोडकडे येण्यास सांगीतले. इंगोले यांचे बोलणे मला निट समजले नसल्याने मी पुन्हा इंगोले यांना फोन करुन ते कोठे आहेत याबाबत विचारले असता इंगोले यांनी ते दामाजी कारखाना रोडला बायपासच्या पुढे असल्याबाबत सांगीतले. सदरबाबत पंच 01 यांनी पोनि महाडिक यांना कळविले. त्यानंतर मी व पंच 01 असे माझ्या दुचाकीवरुन निघालो आमचे पाठोपाठ पोनि महाडिक व पंच 02 तसेच सापळा पथक असे आमचेवर लक्ष ठेवुन शासकीय वाहनाने निघाले.

काही अंतर पुढे गेल्यानंतर सुध्दा इंगोले हे दिसुन येत नसल्याने तसेच मला श्री दामाजी कारखाना रोड पुर्णपणे माहीत नसल्याने मी पुन्हा माझे मो.क्र. वरुन इंगोले यांना फोन केला असता त्यांनी मला कारखाना रोड बायपास येथे येण्यास सांगीतले. त्यामुळे मी सदर ठिकाणी रस्त्यावर उभा असलेल्या इसमास कारखाना रोडबाबत विचारणा करुन त्याप्रमाणे निघालो. व पोनि महाडिक यांना पाठीमागे येण्याकरीता इशारा केला. त्यानंतर काही अंतर पुढे गेल्यानंतर व मी वेळेत इंगोले यांचेजवळ पोहचलो नसल्याने इंगोले यांचा माझे मो.क्रं. वर फोन आला त्यावेळी मी सदरचा फोन कॉल रिसिव्ह करुन चौकात आलो असल्याबाबत सांगीतले. त्यावर इंगोले हे कारखाना रोडवर उभे असल्याबाबत तसेच त्यांना उशीर झाला असल्याबाबत मला सांगत होते. त्यावर मी व पंच असे कारखाना रोडचे दिशेने निघालो.

आमचे पाठीमागे काही अंतर ठेवुन पोनि महाडिक व पंच 02 तसेच सापळा पथक असे आले.

बायपास चौकापासुन अंदाजे 200 मिटर अंतर पुढे गेल्यानंतर सदर ठिकाणी इंगोले हे रस्त्याचे कडेला त्यांचे मोटार सायकलवर बसलेले होते. व त्यांचे पाठीमागे एक महीला बसलेली होती. मी त्यांचे बाजुला माझी मोटार सायकल थांबविली असता इंगोले यांनी त्यांना मयतीला जायचे असल्याबाबत सांगीतले. त्यावर मी माझ्या शर्टच्या डावे बाजुच्या खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम काढुन इंगोले यांचे समोर धरली व पाच हजार आहेत मोपुण घ्या असे म्हणालो. त्यावर इंगोले यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे नेसते पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. व लागलीच त्यांची मोटार सायकल चालु करुन तेथुन निघाले. त्यामुळे मी पोनि महाडिक यांना दिसेल असा लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला.

त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने सदर ठिकाणी येवुन इंगोले यांना गाडी थांबविणेबाबत सांगीतले. परंतु इंगोले यांनी त्यांची मोटार सायकल न थांबविल्याने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहन त्यांचे समोर आडवी लावुन इंगोले यांना थांबविले. व वाहनातुन उतरुन इंगोले यांना पकडुन शासकीय वाहनामध्ये बसविले.

सदर ठिकाणी वाहनामध्ये पोनि महाडिक यांनी मंडळ अधिकारी इंगोले यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव चंद्रकांत गणपतराव इंगोले, वय – 53 वर्षे, पद - मंडळ अधिकारी, नेमणुक - मंडळ अधिकारी कार्यालय, मारापूर, तहसिल मंगळवेढा, रा. दत्तु गल्ली, यशोदा पतसंस्थेच्या मागे, मंगळवेढा, ता. मंगळवेढा जि. सोलापूर, असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी शासकीय वाहनामध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही

ही मंगळवेढा पोलीस ठाणे येथे पूर्ण करण्यात आली.
तरी दि. 13/06/2024 रोजीचे 17.15 ते 18.11 वा. च्या दरम्यान आरोपी लोकसेवक चंद्रकांत गणपतराव इंगोले, वय – 53 वर्षे, पद - मंडळ अधिकारी, नेमणुक - मंडळ अधिकारी कार्यालय, मारापूर, तहसिल मंगळवेढा यांनी आपले स्वत:चे पदांचा दुरुपयोग करून माझे वडीलांनी त्यांचे नावे असलेली शेतजमीन रजीस्टर बक्षीस पत्राद्वारे माझ्या मोठया भावाचे नावे करुन दिली असुन त्यावरुन तलाठी यांनी घेतलेल्या ऑनलाईन नोंदीवरुन सदरची नोंद मंजुर करण्याकरीता मंगळवेढा शहरातील महीला हॉस्पिटलच्या शेजारी रस्त्यावर 8,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 7,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता 5,000/- रुपये स्विकारण्यास संमती दिली. व सदरची लाच रक्कम मंगळवेढा ते श्री दामाजी कारखाना रोडवर बायपास चौकापासुन अंदाजे 200 मिटर अंतरावर रोडवर स्वीकारली आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक चंद्रकांत गणपतराव इंगोले, वय – 53 वर्षे, पद - मंडळ अधिकारी, नेमणुक - मंडळ अधिकारी कार्यालय, मारापूर, तहसिल मंगळवेढा यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RANJEET NARAYANRAO MANE(I (Inspector)) / DCPS151010000402RNMM7801H **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

HC 1408 कोळी T.B.
ठाणे अमलदार
मंगळवेढा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RANJEET NARAYANR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DCPS15101000402RNM